सह्याद्री मित्र संमेलनानिमित्त छायाचित्र स्पर्धा

नाशिक । डोंगरभटकंती करणाऱ्या राज्यातील गिर्यारोहकांसाठी गुरुदक्षिणा हॉल, कॉलेजरोड येथे ५ व ६ जुलै रोजी सह्याद्री मित्र संमेलन पार पडेल यानिमित्त छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

संमेलनाचे हे तिसरे वर्ष आहे. यानिमित्त अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून डोंगर, गडकिल्ल्यावर भटकंतीची आवड निर्माण व्हावी यासाठी या छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मोबाईल आणि डीएसएलआर कॅमेरा मध्ये सह्याद्रीतील लोक जीवन या विषयावर तर ड्रोन स्पर्धेसाठी सह्याद्री आणि गडकिल्ले या विषयावर १ ते ३० मे या कालावधीत, कुठल्याही वेळी काढलेले छायाचित्र स्पर्धेसाठी पात्र असेल. स्पर्धा सर्वांसाठी खुली असून, छायचित्र स्वत: काढलेले असावे. जास्तीत जास्त ३ छायाचित्र स्पर्धक पाठवु शकतात. भाग घेण्यासाठी अंतिम तारीख १५ जून आहे. अधिक माहितीसाठी प्रशांत कोठावदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सारडा उद्योग समूहाकडून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका

नाशिक । ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सारडा उद्योग समूहाच्या वतीने उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहिल्यानगर (अहमदनगर) या जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका स्थानिकांची मागणी आल्यास सुरु करण्यात येतील.

या अभ्यासिकांमध्ये विद्यार्थ्यांसाठी व्यवस्थापक, संगणक, इंटरनेट, सी.सी.टीव्ही, तसेच विविध स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असणारी पुस्तके, खेळाचे साहित्य(इनडोअर आऊट डोअर) आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. वर नमूद केलेल्या जिल्ह्यांतील दोन हजारांहून अधिक लोकवस्ती असलेल्या निवडक गावांमधील जे विद्यार्थी शाळा शिकत आहे किंवा जे विद्यार्थी किमान दहावी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, असे शाळाबाह्य विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतील. उपक्रमासाठी इच्छुक उत्तर महाराष्ट्रातील गावांमध्ये विनामूल्य तत्वावर ग्रामपंचायत अथवा जागा मालकांकडून किमान ५०० चौरस फूट बांधीव जागा उपलब्ध झाल्यास तसेच संस्थेच्या निर्धारित केलेल्या निकषांमध्ये बसल्यास अशा गावांमध्ये प्राधान्याने अभ्यासिकेचा उपक्रम सुरु करण्यात येणार आहे. इच्छुक ग्रामपंचायत अथवा संबंधित जागा मालकांनी, श्री. श्रीरंग किसनलाल सारडा चॅरिटेबल फाउंडेशन, कॅमल हाऊस, काठेगल्ली सिग्नल, द्वारका नाशिक-पुणेरोड या पत्त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन सारडा उद्योग समूहाकडून करण्यात आले आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी अपत्यांसाठी मोफत शिक्षण

नाशिक । भारतीय जैन संघटना (बीजेएस) यांच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही, महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींना शैक्षणिक वर्ष २०२५ २०२६ मध्ये प्रवेश देऊन १२वी पर्यंतचे शिक्षण वाघोली पुणे येथे पूर्णतः मोफत दिले जाणार आहे.

भोजन, निवास, वैद्यकीय व इत्यादी सुविधा शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत दिल्या जाणार आहेत. यासाठी इयत्ता ५ वी व ६ वी मध्ये १०० मुला-मुलींना प्रवेश देण्यात येणार आहे. ७ जून २०२५ पर्यंत अर्ज वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प, पुणे-नगर रोड, बकुरी फाटा, पुणे येथे सादर करावे असे आवाहन करण्यात आले आहे. बीजेएसचे संस्थापक शांतिलाल मुथ्था गेली ४० वर्षांपासून असे सामाजिक कार्य करीत आहेत. आत्तापर्यंत ३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पुनर्वसन बीजेएसने केले आहे. गरजू विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केतन शहा व प्रवीण पारख यांनी केले आहे.

एचसीजी मानवता-सनअ‍ॅक्टची भागीदारी

रुग्णांना प्रभावी उपचाराचा पर्याय होणार खुला

नाशिक । एचसीजी मानवता कॅन्सर सेंटर येथे सनअ‍ॅक्टच्या सहकार्याने नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स इन सेल अ‍ॅण्ड जेन थेरेपी कार्यान्वित झाले आहे.

यासंदर्भात एचसीजी मानवता कॅन्सर सेंटर आणि सनअ‍ॅक्ट यांच्यात कॅन्सरवर उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक थेरपीज उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या माध्यमातून केवळ मोठ्या शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या भविष्यात प्रभावी ठरणाऱ्या कर्करोग उपचारावरील वैद्यकीय सेवा नाशिक जिल्ह्यासह विभागीय पातळीवर उपलब्ध होऊ शकणार आहेत.

सेंटरच्या उद्घाटन समारंभास प्रमुख अतिथी म्हणून मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथील अकॅडेमिक डायरेक्टर व इंडियन अकॅडमी ऑफ पिडियाट्रिक्सच्या पिडीयाट्रिक्स हेमॅटो-ऑन्कोलॉजी चॅप्टरचे अध्यक्ष डॉ.श्रीपाद बाणावली उपस्थित होते. तर मान्यवर अतिथी म्हणून टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या मेडिकल आन्कॉलॉजी विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. कुमार प्रभास यांच्यासह सनअ‍ॅक्टचे संस्थापक प्रा डॉ.विजय पाटील, सीईओ कुशाग्रा शर्मा, सहसंस्थापक डॉ.आशय करपे, एचसीजी मानवता कॅन्सर सेंटर आणि किम्स मानवता हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक प्रा. डॉ.राज नगरकर, सिनियर कन्सल्टंट डॉ.प्रियतेश द्विवेदी, डॉ.श्रीनिवास राऊत, डॉ. मुकेश चौधरी उपस्थित होते.

सहकार महर्षी भास्कर कोठावदे यांच्या जयंतीनिमित्त समाजकार्य

नाशिक । सहकारमहर्षी भास्कर कोठावदे यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त रिमांड होम (मुलामुलींचे बाल निरीक्षण गृह), उंटवाडी येथे किराणा मालाचे वाटप करण्यात आले.

हा एक चांगला उपक्रम आहे सर्व संस्थामधील संचालक तसेच संस्थेचे सरव्यवस्थापक प्रमोद वधान हे आमच्या संस्थेला नेहमी मदत करत असल्याचे चंदूलाल शहा यांनी सांगितले.

संस्थेचे उपाध्यक्ष केशव वाणी व संचालक विलास कोठावदे यांनी भास्कर कोठावदे यांच्या आठवणींना उजाळा दिला. सुवर्णा परिवार, सुवर्णलक्ष्मी परिवार व मित्र परिवाराच्या वतीने भास्कर कोठावदे यांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी लक्ष्मीकांत कोठावदे, अविनाश कोठावदे, मालती कोठावदे, प्रकाश दिघे, विलास कोठावदे, शरद कर्डीले, अशोक वाणी, निर्मला गांधी, सुभाष गांधी, भालचंद नेरकर, साहेबराव पवार, सुभाष येवला, के. के. चव्हाण, हितेश शहा, प्रमोद बधान, राहुल बोरसे, सचिन पालकर निरीक्षण गृह व बालगृह येथील विद्यार्थी व सेवकवृंद आदी उपस्थित होते.

शास्त्रोक्त पद्धतीने मधुपालन व्हावे : साठे

बसवंत गार्डन मधुसखी पुरस्कारांचे वितरण

नाशिक । पर्यावरण संतुलन तसेच सकस पीकवृद्धीला मोलाचे साह्य करणारी आणि मधासह आनुषंगिक उपयुक्त पदार्थ उपलब्ध करून देणारी मधमाशी हा एक अनन्यसाधारण कीटक आहे. हे लक्षात घेता, मधमाश्यांचे शास्त्रोक्त पद्धतीने जतन आणि संवर्धन व्हावे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांनी केले.

पिंपळगाव येथील खादी व ग्रामोद्योग महामंडळ आणि ग्रीनझोन अ‍ॅग्रोकेम प्रा.लि. संचलित बसवंत मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मधमाशी दिनाच्या औचित्य साधत बसवंत गार्डनमध्ये राज्यस्तरीय मधुमित्र व मधुसखी पुरस्कार सोहळा पार पडला, यावेळी रवींद्र साठे बोलत होते. ग्रीनझोनचे कार्यकारी संचालक संजय पवार, ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. बी.बी. पवार, मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निधी पांडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील, वित्त सल्लागार तथा प्रमुख लेखाधिकारी स्मिता खरात, महाबळेश्वरस्थित मध संचालनालयाचे प्र. संचालक रघुनाथ नारायणकर, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी सुधीर केंजळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सचिन उगले, राजू मंडळ यांना मधुमित्र, तर तेजा घोरपड यांना मधुसखी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मधमाशी पालनाचे क्षेत्रीय पुरस्कार दिलीप वाडेकर, शंकर खंदारे, संजय पाटील यांना देण्यात आले. सूत्रसंचालन आनंद चौधरी, रघुनाथ नारायणकर यांनी प्रास्ताविक, तर आभार सुधीर केंजळे यांनी मानले. डॉ. बी.बी. पवार, डॉ. भास्कर गायकवाड, विजय पवार, महेश पाटील, संदीप वाघ, संदीप सोनवणे, नितीन कराळे, निलेश भामरे यावेळी उपस्थित होते.

अंबानी दाम्पत्याचे दात्यांमध्ये सर्वोच्च स्थान

'टाइम'च्या यादीत समावेश

मुंबई । वृत्तसंस्था

रिलायन्स इंडस्ट्रीजचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर मुकेश अंबानी आणि रिलायन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी यांनी वर्ष २०२४ मध्ये ४०७ कोटी (अंदाजे ४८ दशलक्ष) दान करून देशातील सर्वोच्च दात्यांमध्ये आपले स्थान मिळवले आहे.



अंबानी दाम्पत्याच्या परोपकारी उपक्रमांमुळे देशभरातील लाखो लोकांच्या जीवनाला सकारात्मक स्पर्श झाला आहे. या उपक्रमांत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या, महिलांसाठी करिअर प्रशिक्षण, ग्रामीण भागातील शाश्वत शेतीला प्रोत्साहन, जलसंधारण प्रकल्प, रुग्णालयांचे निर्माण, दृष्टिदोष असलेल्या नागरिकांना मदत आणि शाळांच्या मूलभूत सुविधा बळकट करणे यांचा समावेश आहे.

स्वतः यशस्वी उद्योजिका असलेल्या आणि आपल्या सुपुत्र आकाश अंबानी यांच्यासह मुंबई इंडियन्स क्रिकेट संघाच्या सह-मालकीण असलेल्या नीता अंबानी या खेळाडूंना घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्स फाउंडेशनमार्फत खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा व आधुनिक क्रीडा विज्ञानाधारित प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाते, ज्यामध्ये महिला खेळाडूंवर विशेष लक्ष केंद्रित केले जाते. नीता अंबानी म्हणाल्या, महिलांसाठी व्यावसायिक क्रीडाक्षेत्रात करिअर घडवणे अधिक कठीण असते, त्यामुळे त्यांचा यशस्वी प्रवास अधिक महत्त्वाचा ठरतो.अंबानी कुटुंबाचे हे परोपकारी योगदान केवळ गरजूंना मदत करणारे नाही, तर सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक प्रभावी पाऊलआहे.

दरम्यान,प्रसिद्ध अमेरिकन मासिक 'टाइम' ने आपली पहिली 'टाइम१०० फिलँथ्रॉपी २०२५' यादी जाहीर केली आहे. या यादीत अशा १०० जागतिक व्यक्तींचा समावेश आहे, जे दानशूरता व समाजसेवा यांच्या माध्यमातून भविष्य घडवताना दिसत आहेत. या प्रतिष्ठित यादीत भारताचे प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी आणि रिलायन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी यांचाही समावेश झाला असून, हे भारतासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

आजचे कार्यक्रम

✲ स्व. आण्णासाहेब वैशंपायन स्मृती व्याख्यान

वक्ते : श्री किरण पुरंदरे, पक्षी तज्ञ, पिरैंदरी, ता. साकोला, जि. भंडारा

विषय : जंगलातील ४०० दिवस

✲ मयूर टुकडीया प्रस्तुत – विशाल, रेणुका, प्रियांका

नैसर्गिक शेतीच्या आधारे फुलवले सेंद्रीय फूड फॉरेस्ट

नाशिक । देशदूत चमू

मातीत येऊन मातीची नाळ जोडली तर आपण शेतीचा विचार करायला पाहिजे. झाडे लावली पाहिजे, झाडे वाचवली पाहिजे. कारण ही काळाची गरज आहे. ही झाडे लावण्याचे काम विविध फळबागांच्या माध्यमातून इगतपुरी तालुक्यातील परदेशवाडी येथील मनीषा झाडे आणि त्यांचे पती दशरथ झाडे यांनी सरकारी नोकरी सोडून नैसर्गिक शेतीची कास धरत फूड फॉरेस्ट फुलवले आहे. त्यांच्या शेतात खडक परदेशवाडी या गावी दै. देशदूत संपादक डॉ. वैशाली बालाजीवाले यांनी त्यांची मुलाखत घेतली.

व्हिडीओ पाहण्यासाठी हा बारकोड स्कॅन करा

मुंबईहून परतल्यानंतर इगतपुरीतील या गावी त्यांनी जमीन विकत घेत नैसर्गिक शेतीचे ज्ञान संपादन करत अनुभवातून शिकत गेल्या. सात वर्षांपासून हे अनोखे फूड फॉरेस्ट त्यांनी उभारले आहे. एमएसडब्लू शिकलेल्या मनिषाताई ह्या सामाजिक भान जोपासतात. त्यामुळे ग्लोबल वार्मिंगचा धोका ओळखून त्या नैसर्गिक शेती करतात. या पध्दतीत शेतीमधले काहीही वाया न घालवता त्याचा खत किंवा साधन म्हणून त्या वापर करतात. याबाबतीत स्वत:च्या एनजीओमार्फत त्या इतरांना मार्गदर्शन देखील करतात.

मनीषा झाडे यांनी त्यांच्या फूड फॉरेस्टमध्ये जवळपास ३०० आंब्याच्या रोपांची लागवड केली आहे. तसेच सुपारीचे झाड, दालचिनी, काश्मिरी अ‍ॅपल, अंजीर, वॉटर अ‍ॅपल, अननस, फणस, सोनचाफा, पपई, देशी आवळा, डाळिंब, चिकू, सफरचंद, जांभूळ, स्टार फूड, लिची, मलबेरी, काजू, बकुळे, तुती, मलबेरी, स्ट्रॉबेरी, ब्ल्यू बेरी, गवती चहा, केळीच्या विविध प्रकारच्या झाडांसह वेगवेगळ्या प्रकारची फळ

शेतीचा अनुभव नव्हता

सरकारी नोकरी सोडून आल्यानंतर मनीषा झाडे यांना शेती करण्याचा कुठलाही अनुभव नव्हता. यानंतर त्यांनी यूट्युब, वृत्तपत्र यामध्ये शेतीविषयी असणारी माहिती, तसेच शेतीमधील विविध तज्ञांचे असणारे व्हिडिओ बघून शेती करण्यास सुरुवात केली. यामध्ये पारंगत होण्यासाठी त्यांना जवळपास १० वर्षे लागली. शेतीविषयक सर्व माहिती जाणून आणि प्रत्यक्षात शेतीची कामे केल्यानंतर आता मनीषा झाडे या सूक्ष्म नियोजन करून शेती करत आहेत.

फॅमिली फार्मर संकल्पना

मनीषा झाडे त्यांच्या फूड फॉरेस्टमध्ये विविध प्रकारच्या फळ झाडांसह भाजीपाल्याचे देखील उत्पादन घेत आहेत. यासाठी त्यांनी फॅमिली डॉक्टरप्रमाणे फॅमिली फार्मर ही संकल्पना राबवली आहे. त्यांच्या फूड फॉरेस्टमध्ये कोबी, गवार, भेंडी, फ्लॉवर, यासह विविध प्रकारच्या पालेभाज्यांची लागवड केली आहे. या पालेभाज्या त्या बाजारात विक्रीसाठी न नेता येथील कुटुंबांना विकत असतात.

पान १ वरुन..

भुजबळ नवव्यांदा मंत्रिमंडळात

मार्ग मोकळा होऊन या निवडणुका यावर्षी दिवाळीनंतर होणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वी राष्ट्रवादीच्या नेतृत्वाने भुजबळ यांच्या निमित्ताने ओबीसी कार्ड खेळण्याचा प्रयत्न केला आहे. अजित पवार यांनी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि पक्षातील काही ज्येष्ठ मंत्र्यांशी चर्चा करून भुजबळ यांचे राजकीय पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला. यानिमित्ताने अजित पवार गटाने ओबीसी मतदारांना चुचकारण्याचा प्रयत्न केल्याचे मानले जाते. दरम्यान, भुजबळ यांच्या शपथविधीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री, आमदार आणि भुजबळ यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

पुढील पाच दिवस पावसाचा जोर वाढणार

जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. विशेषतः कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागांत जोरदार पावसाची शक्यता असून, २० मे रोजी दक्षिण कोकणात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे कोकणासाठी मरेड अलर्टफजारी करण्यात आला आहे.

पाच वर्षांत ३५ लाख घरांचा संकल्प

सर्वसमावेशक, शाश्वत आणि पुनर्निर्माणशील अशा चार मार्गदर्शक तत्त्वांभोवती या धोरणाची रचना करण्यात आली आहे. या धोरणात ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी आणि औद्योगिक कामगारांसाठी विशेष उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये नोकरदार महिला, विद्यार्थी यांना भाडेतत्त्वावर आणि औद्योगिक कामगारांसाठी १० वर्षांपर्यंत भाडेतत्त्वावर त्यानंतर मालकी हक्काने घरे दिली जातील. सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे विकासक आणि प्रचालकासाठी प्रोत्साहन दिले जाईल. सामाजिक गृहनिर्माणासाठी सी.एस.आर. निधीचा वापर केला जाईल. याकरिता प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

राज्याने सन २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आणि अल्प उत्पन्न गटासाठी ३५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवली आहेत. यासाठी ७० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. तसेच त्यापुढील १० वर्षात ५० लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे. पुढील वर्षापर्यंत सर्व जिल्ह्यात निवासी सदनिकांची आवश्यकता आणि मागणीचे सर्वेक्षण तसेच विश्लेषण करून यापुढे योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे..

अणुशास्त्रज्ञ श्रीनिवासन यांचे निधन

प्रमुख प्रकल्प अभियंता म्हणून नियुक्त करण्यात आले. १९६७ मध्ये, त्यांनी मद्रास अणुऊर्जा केंद्राचे मुख्य प्रकल्प अभियंता म्हणून पदभार स्वीकारला तेव्हा त्यांच्या नेतृत्वाने देशाच्या अणुकार्यक्रमाला आकार दिला.त्यांनी पॉवर प्रोजेक्ट्स इंजिनिअरिंग डिव्हिजन, डीएईचे संचालक आणि न्यूक्लियर पॉवर बोर्डाचे अध्यक्ष यासारखी अनेक महत्त्वाची पदे भूषवली. १९८७ मध्ये, त्यांना अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि अणुऊर्जा विभागाचे सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले. त्याच वर्षी, ते न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड चे संस्थापक-अध्यक्ष बनल

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र तेजस्विनी मासिक सोडत

तिकीट किं. रु. 200/- • सोडत क्रमांक 05 • सोडत दिनांक 20/05/2025

मालिका	TJ-00	TJ-01	TJ-02	TJ-03	TJ-04	TJ-05	TJ-06	TJ-07	TJ-08	TJ-09
पहिले बक्षिस रु. 25 लाख (रु. 25 लाखाची 2 बक्षिसे)	किशोर लॉटरी सेंटर, सांगली		3629	-	-	6641	-	-	-	-

सर्व मालिकांसाठी ● FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES ● सर्व मालिकांसाठी

बक्षीस										
दुसरे बक्षिस रु. 10000/-	0340	1593	3145	4295	4800	5423	5857	6924	8179	9067
तिसरे बक्षिस रु. 5000/-	0299	2438	2536	2730	3237	3388	4472	4974	6323	9381
चौथे बक्षिस रु. 2000/-	0494	1798	2773	5575	5730	5765	7096	7931	8298	9645
पाचवे बक्षिस रु. 1000/-	0169	0828	4634	5181	5733	6101	7455	7805	8980	9667
सहावे बक्षिस रु. 500/-	0166	0659	1426	3156	3621	4256	6658	6813	8168	9354

10000 चे 16 बक्षीसे जिंकले

सातवे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

		1373	2246	2720	3351	4368	5152	5850	6646	7160	7858	8616	9240
		1391	2251	2727	3368	4385	5156	5855	6664	7161	7860	8658	9252
0002	0539	1423	2262	2732	3381	4394	5195	5857	6666	7210	7864	8684	9259
0005	0560	1426	2268	2742	3411	4398	5216	5888	6667	7217	7875	8702	9262
0013	0575	1430	2272	2802	3431	4424	5225	5895	6668	7229	7878	8718	9281
0023	0594	1451	2281	2821	3435	4448	5247	5950	6669	7274	7917	8728	9295
0036	0604	1533	2317	2830	3520	4449	5251	5951	6671	7277	7930	8738	9365
0042	0630	1554	2342	2835	3535	4464	5265	5954	6674	7297	7957	8759	9398
0048	0686	1612	2344	2842	3541	4481	5267	5982	6681	7302	7971	8782	9402
0076	0690	1619	2362	2850	3571	4490	5279	5988	6682	7303	7996	8789	9426
0093	0718	1721	2384	2874	3583	4503	5298	5994	6739	7307	8030	8800	9429
0097	0725	1733	2392	2902	3603	4550	5299	6006	6760	7386	8098	8802	9463
0109	0754	1827	2397	2942	3631	4559	5353	6069	6780	7394	8105	8826	9492
0110	0760	1831	2409	2983	3635	4569	5419	6094	6785	7447	8139	8840	9527
0113	0777	1832	2429	3003	3689	4582	5454	6095	6810	7449	8153	8858	9530
0165	0818	1847	2435	3035	3718	4594	5510	6138	6813	7475	8168	8862	9558
0173	0872	1910	2451	3059	3725	4618	5511	6151	6850	7482	8179	8876	9569
0201	0920	1917	2470	3063	3834	4666	5515	6165	6895	7501	8186	8888	9594
0205	0937	1942	2485	3119	3838	4690	5524	6172	6904	7541	8187	8898	9598
0261	1010	1949	2489	3132	3935	4694	5532	6173	6915	7551	8188	8900	9753
0270	1075	1960	2490	3135	3937	4788	5540	6220	6916	7579	8202	8914	9757
0297	1079	1971	2492	3142	3979	4805	5559	6258	6932	7601	8207	8932	9840
0302	1081	1977	2510	3146	3983	4809	5560	6264	6950	7617	8338	8933	9849
0309	1141	2003	2528	3169	4012	4843	5564	6265	6955	7627	8348	8995	9895
0318	1146	2012	2530	3196	4051	4860	5565	6311	6956	7647	8378	9014	9897
0330	1149	2024	2540	3199	4061	4881	5570	6363	6986	7654	8384	9034	9900
0348	1154	2102	2584	3212	4071	4883	5576	6365	6996	7670	8398	9039	9901
0349	1160	2111	2612	3229	4189	4893	5582	6382	7009	7680	8428	9060	9909
0367	1181	2125	2620	3263	4201	4915	5698	6459	7010	7697	8468	9068	9921
0395	1192	2126	2626	3286	4248	4942	5703	6464	7017	7700	8481	9118	9942
0397	1232	2128	2628	3308	4276	4972	5739	6518	7042	7747	8490	9181	9950
0427	1266	2145	2650	3323	4294	5010	5741	6524	7070	7750	8518	9191	9980
0471	1300	2165	2672	3325	4304	5033	5756	6531	7103	7760	8566	9199	9983
0478	1311	2202	2675	3330	4354	5054	5821	6580	7107	7770	8571	9206	9993
0480	1325	2209	2681	3336	4362	5078	5834	6624	7157	7774	8580	9219	9996
0508	1345	2240	2682	3349	4364	5135	5847	6632	7158	7838	8610	9221	9999

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी